# नरभक्षक टी-१ वाघिणीला ठार मारण्याची कार्यवाही नियमानुसारच - वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

मुंबई, दि. 5 : पांढरकवडा वनक्षेत्रातील नरभक्षक ठरलेल्या टी-1 वाघिणीला जवळपास 2 महिन्यांपासून जेरबंद करण्याचे सर्व प्रयत्न करुनही ती वाघीण जेरबंद झाली नाही. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या (एनटीसीए) मार्गदर्शक तत्वानुसार या नरभक्षक वाघिणीला जेरबंद करण्याच्या किंवा प्रयत्न करुनही जेरबंद न झाल्यास ठार करण्याचे आदेश प्रधान मुख्य वनसंरक्षक (पीसीसीएफ) तथा मुख्य वन्यजीव रक्षक यांनी दिले. त्यामुळे नरभक्षक वाघिणीला ठार करण्याची सर्व कार्यवाही नियमानुसारच झाली आहे, अशी माहिती वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज मंत्रालयात झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

नरभक्षक टी-1 वाघिणीच्या मृत्यूसंदर्भात आज मंत्रालयात श्री. मुनगंटीवार यांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. यावेळी ते पुढे म्हणाले, वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनासाठी त्याचबरोबर मानवी जीवनाला धोका निर्माण करणाऱ्या वन्यजीवांचा बंदोबस्त करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरिता उप वनसंरक्षक (प्रादेशिक) यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक सल्लागार आणि संनियंत्रण समितीच्या नेमणुका केलेल्या आहेत. या समितीमध्ये एनटीसीएचे प्रतिनिधी, तज्ज्ञ, वन्यजीव क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधी, पशुवैद्यक आदींचा समावेश असतो.

टी-1 या वाघिणीने पांढरकवडा वनक्षेत्रात मानवांवर हल्ले करुन 13 जणांचा बळी घेतला. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन या समितीच्या शिफारशीनुसार मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यवतमाळ यांनी नरभक्षक वाघिणीस ठार मारण्याबाबतचा अहवाल नागपूर येथील पीसीसीएफ यांना पाठविला. त्यावर त्यांच्याकडून टी-1 वाघिणीस जेरबंद करणे किंवा शक्य न झाल्यास ठार मारण्याचे आदेश यावर्षी जानेवारीमध्ये दिले. त्यानंतरही ऑगस्ट 2018 मध्ये या वाघिणीच्या हल्ल्यात 3 मानवी जिवीतहानीच्या घटना घडल्या. त्यामुळे वनविभागाने सर्व पुराव्यांसह वन्यजीव संरक्षण अधिनियमातील तरतुदीनुसार वाघिणीस ठार मारण्याचा प्रस्ताव नागपूर येथील प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांना सादर केला. त्यानुसार त्यांनी टी-1 वाघिणीस जेरबंद करणे किंवा शक्य न झाल्यास ठार मारणे आणि तिच्या दोन बछड्यांना जेरबंद करुन रेस्क्यू सेंटरला पाठविण्याचे आदेश दिले. उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालय यांनीही हे आदेश कायम केले.

या वाघिणीस बेशुद्ध करुन (ट्रॉन्क्विलाईझ) जेरबंद करण्यासाठी वनविभागाचे सुमारे 200 अधिकारी गेले 2 महिने रात्रंदिवस कार्यरत होते. वाघिणीचा शोध घेण्यासाठी प्रशिक्षित हत्तींचा वापर, ट्रॅप कॅमेरे, इटालियन प्रशिक्षित श्वानांचा वापर, पॅराग्लायडर, ड्रोनचा वापर आदी सर्व प्रयत्न केले. या मोहिमेमध्ये वनविभागाच्या कर्मचाऱ्यांसमवेत शार्पशूटर म्हणून नवाब शफात अली खान व त्यांच्या पथकासह असगर अली खान यांचा समावेश होता.

दि. 2 नोव्हेंबर 2018 रोजी मध्यरात्रीच्या सुमारास नरभक्षक टी-1 वाघीण बोराटी- वरुड- राळेगांव रस्त्याच्या कडेला गस्त घालणाऱ्या वनविभागाच्या गस्ती पथकाला दिसून आली. या पथकातील श्री. शेख यांनी ट्रॉन्क्विलाईझिंग गन चा वापर करुन बेशुद्ध करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतरही वाघिण बेशुद्ध झाली नाही व तिने मागे फिरुन उघड्या जिप्सीमध्ये असलेल्या गस्तीपथकावर प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गस्ती पथकातील शार्प शूटर श्री. असगर यांनी स्वसंरक्षणार्थ मारलेल्या गोळीने या वाघिणीचा मृत्यू झाला.

या वाघिणीच्या सब अडल्ट होत असलेल्या बछड्यांचा शोध घेऊन त्यांना पकडण्याबाबत जोमाने कार्यवाही सुरु आहे. त्यांचे योग्य संवर्धन होण्यासाठी पुनर्वसन करण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाने व्याघ्र संवर्धनसाठी अनेक महत्वपूर्ण उपाययोजना केल्यामुळे महाराष्ट्रात वाघांच्या संख्येत 20 ते 25 टक्क्यांनी वाढ झाली आहे. वनांचे संवर्धन आणि जतन करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे. वन्य प्राणी आणि मानवांचा संघर्ष होणार नाही या दृष्टीने वन विभागाकडून नागरिकांमध्ये जनजागृती आणि विविध माध्यमातून माहिती देण्यात येते, असेही वनमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले. यावेळी वनविभागाचे सचिव विकास खारगे उपस्थित होते.

0000